अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# मोबाईलमुळे मुलांकडे दुर्लक्ष होऊन कसे चालेल

जमाना कुठे चाललाय याचा एकेक नमुना पहा. सध्याचे जग मोबाईल आणि त्यावरच्या व्हॉटसअपमुळे अक्षरश: वेडे झाले आहे. आजच्या तरुण पिढीमध्ये त्याचे आकर्षण असणे, पोराटोरांमध्ये मोबाईल मस्तीचा धिंगाणा चालू राहणे हे एकवेळ समजू शकते. परंतु पोराटोरांचे आई-बापही जेव्हा दिवसातले १०-१० तास मोबाईल कानाला चिटकवून बसतात, त्यावेळी कपाळावर हात मारून घेण्याशिवाय दुसरा मार्गच उरत नाही. यातला अत्यंत दयनीय, शोचनिय आणि तितकाच वेदनादायी भाग म्हणजे, ज्या आई-वडिलांना नोकरी-चाकरी, धंदा-व्यवसाय यामुळे १२-१२ तास घराबाहेर राहावे लागते. पैशासाठी घरदार चालवण्यासाठी पोटच्या पोरांना दुसऱ्यांच्या हवाली करावे लागते. ही भावनिक तडजोड करावी लागत असताना दिवसातले काही तास किंवा सुट्टीच्या दिवशी अधिकाधिक वेळ मुलांबरोबर घालवणे आवश्यक असते. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की आताच्या आई-बापांना मोबाईल वेडापायी आपल्या मुलांशीदेखील बोलायला वेळ नाही. मोबाईल वापरणारे ७० टक्के आई-बाप दिवसाकाठी साधारणपणे १० ते ११ तास फोनवर बोलतात आणि आठवड्याला सरासरी ६८ तास हे पालक मोबाईलच्या नादात गुंतलेले असतात. अलिकडे एका शैक्षणिक उपक्रमांतर्गत मुंबईतल्या जवळपास १९ हजार विद्यार्थ्यांचे पालक आणि ५ हजार ६०० विद्यार्थ्यांशी संपर्क साधल्यानंतर ही माहिती गोळा केली गेली. आपले मित्र, मैत्रिणी, ऑफिसमधले सहकारी काही प्रमाणात नातेवाईक अशांशी गप्प-टप्पा करण्यात चॅटिंग करण्यात व्हॉटसअपवर हॅलो, हाय, कसं काय करण्यात या मायबापांचे दहा तास कसे काय निघून जातात हे त्यांचे त्यांनाच कळत नाही. तो वेळही त्यांना अपुरा वाटतो. मग उरला सुरला वेळ ते आपल्या मुलांसाठी देतात. एकूण २४ तासांचा हिशोब केला तर आपल्या आई-वडिलांच्या प्रेमासाठी आसुसलेले खरे तर अक्षरश: व्याकूळ झालेल्या मुलांची ही प्रेमाची भूक पूर्ण करण्याकडे आजच्या आई-बापांचे लक्ष नाही, हे सर्वेक्षणाने सिध्द केले आहे. यातला सर्वात क्लेशदायक आणि तितकाच आश्चर्याचा भाग म्हणजे हे दहा बारा तास घराबाहेर राहणारे नोकरी व्यवसायात अडकून पडलेले हे आई-बाप जेव्हा सुट्टीच्या दिवशी घरी असतात. तेव्हासुध्दा ते मुलांशी बोलण्यापेक्षा मोबाईलवरच जास्त वेळ घालवत असल्याचे आढळून आले आहे.

### भावना तितक्याच महत्त्वाच्या

आता अशा मोबाईलवेड्या आई-बापांकडून मुलांनी कोणती अपेक्षा ठेवावी किंवा त्या मुलांनी काय संस्कार घ्यावेत? असा प्रश्न निर्माण होतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, आजकालच्या आई-बापांचे मुलांपेक्षा मोबाईलवरचे प्रेम वाढले आहे किंवा, मुलांबरोबर काही क्षण आनंदात घालवण्याच्या अनुभवापेक्षा त्यांना सतत मोबाईलवर राहून चकाट्या पिटण्यात जास्त आनंद वाटतो, याला नेमके काय म्हणावे? शिकल्या-सवरल्या अगदी उच्चशिक्षित असलेल्या या पालकांना या गोष्टी कळत नसतील असे कसे म्हणता येईल. कदाचित कळत असूनही त्या वळत नसतील. मात्र या कळण्या आणि नकळण्यामुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एक भावनिक अंतर वाढत जाते. त्यातून पुढे त्याचे पर्यवसान सामाजिक बेफिकीरीमध्ये पहायला मिळते. एक साधा मोबाईल भावभावनांशी कसा खेळ खेळू शकतो याचे अनेक किस्से अलिकडे ऐकायला मिळत असतात. मोबाईल हे साधन भारतीयांसाठी नवीन आहे. अजून त्याचा खेड्यापाड्यात पाहिजे तसा प्रसार झालेला नाही. शहरात मात्र त्याने आपली एक प्रकारे मोहिनी घातली आहे. ज्याला ग्लॅमरपेक्षाही 'नशा' हा शब्दच योग्य ठरतो. या मोबाईल व्यसनाची करामत अशी की तो एक साधन म्हणून वापरता येतो. त्याचा संपर्कासाठी चांगला उपयोगही होऊ शकतो. पण त्याच्या या चांगुलपणातच फसणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. कारण मोबाईलवरचे बोलणे हे असे काही वेळ खाते की बोलणाऱ्यांच्याही लक्षात येत नाही. आता बोलण्यापेक्षा व्हॉटसअप प्रकार जास्त जोरात फोफावला आहे. त्याचे आकर्षण का तर त्यात गोपनियता असते. प्रत्यक्ष बोलणे नाही चॅटींग असते. आपण कोणाशी गप्पा मारत आहोत, काय गप्पा मारत आहोत याचा समोरच्याला पत्ता लागत नाही. लॉकिंग सिस्टीम असल्याने सर्व काही सिक्रेट असते. पासवर्ड लागत असल्याने जो तो वाटेल त्या प्रमाणे वागायला मोकळा असतो. केवळ मित्र-मैत्रिणीच नाही तर ज्यांचा तुमच्याशी कधीही संबंध आलेला नाही, ज्याला तुम्ही कधी पाहिलेले नाही अशा अनेक उडाणटप्पूंचे ग्रुप व्हॉटसअपवर येतात आणि तुम्हाला त्यांच्या ग्रुपमध्ये खेचत असतात. त्याचे आकर्षण तरुण-तरुणींबरोबर प्रौढांमध्येही वाढू लागले आहे. पालकांना बालकांकडे लक्ष घायला वेळ नाही. कारण अनेक पालक अशा व्हॉटसअपचे शौकिन असतात. अन्यथा रोज दहा तास मोबाईलला चिटकून राहण्यासारखे त्यात असे काय असते. कारण अगदी सुट्टीच्या दिवशीदेखील जर ते मुलांपेक्षा मोबाईलमध्ये जास्त गुंतत असतील तर त्यात निश्चितच काहीतरी काळंबेरं आहे असे समजायला काही हरकत नाही.

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

खरे तर या मोबाईलचा उपयोग मुलांच्या अभ्यासासाठी मुलांचे सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी करता येऊ शकतो. मोबाईल हे जितकं संवादाचं साधन आहे तितके ते माहिती देण्याचं प्रबोधनाचं माध्यम झालं पाहिजे. रेल्वे, विमान, बसची आरक्षण मोबाईलवरून करता येतात. पैशांची देवाणघेवाण मोबाईल बँकिंगमुळे शक्य होत आहे. रेल्वे, विमान, बसचे टाईमटेबल उपलब्ध होतं. जगाचे नकाशे तुम्हाला मिळू शकतात. अगदी जगातल्या नावाजलेल्या डिक्शनरीज तुम्हाला तुमच्या मोबईलवर डाऊनलोड करता येतात. चांगल्या लेखकांची पुस्तके नाटके डाऊनलोड करून पाहता येतात. अशा चांगल्या आणि संस्कारसंपन्न कामांऐवजी चित्रपट आणि अश्लिल मेसेज देण्याकरीता तशी चित्र पाहण्याकरीता मोबाईलचा उपयोग केला जातोय. त्यातून हा मोबाईल सर्वांचा मेंदू कुडतरून मेंदूला बधीर करतो आहे. हे केवळ एका व्यक्तीचे एका कुटुंबाचे नुकसान नाही तर त्यात मोठा सामाजिक तोटाही आहे. मोबाईलचा वापर गरजेप्रमाणे केला पाहिजे. मोबाईल ही काळाची गरज आहे. परंतु तिचा वापर करताना कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असे होता कामा नये. आधुनिकतेबरोबर या आधुनिक साधनांचा तितक्याच संयमाने वापर होणे हीदेखील काळाचीच गरज आहे हे लक्षात घ्यावे लागेल.